<u>MHSN05000530-2011</u>

## रे.दि.मु.नं. ११८/२०११ मधील निशाणी क्र. १८८ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ नुसार दावा रद्द करण्यात यावा याकरीता दाखल केला आहे.

२. वादीचे कथनानुसार त्यांनी सदरचा दावा हा वाटप व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. त्यांचे कथनानुसार प्रतिवादी क्र.३३ यांनी प्रस्तुत दाव्यास दिनांक ०२.११.२०२३ रोजी कैफियत व त्यांचा प्रतिदावा दाखल करुन दिनांक ०५.०९.१९५६ रोजीचे बक्षीसपत्र व दिनांक १०.०५.१९९० चा खरेदी दस्त आव्हानित केला आहे. सदर प्रतिदाव्याचे अवलोकन केले असता, प्रतिवादींची मागणीस मुदतीच्या कायद्याची बाधा येते. त्यामुळे प्रतिवादींचा प्रतिदावा नामंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली.

३. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे नि.१९५ अन्वये दाखल करुन कथन केले की, वादी क्र.२ माणिक राजाराम पवार हे प्रतिदाव्यामध्ये आवश्यक पक्षकार नाहीत. त्यामुळे त्यांना वादी क्र.१ करीता सही, अंगठा, प्रतिज्ञा/अर्ज दाखल करण्याबाबत अधिकार नाही. तसेच, वादी क्र.१ ने त्यांना त्याबाबत अधिकारपत्र दिल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल नाही. प्रतिदाव्यातील कलम १ मधील नमुद मिळकतीबाबत इस्लामपूर येथील दिवाणी न्यायालयात दावा प्रलंबित आहे. या प्रतिवादीस दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे अर्ज दाखल करुन या दाव्याकामी सामील करण्यात आलेले आहे. या प्रतिवादी क्र.३३ ला दावा गुणदोषावर चालुन निकाली झाल्यास त्यामध्ये त्यांना यश मिळणार असल्याची खात्री असल्याने वादीने प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. दावा गुणदोषावर चालून निकाली झाल्यास वादीचे काही नुकसान नाही. याउलट या प्रतिवादींना दावा गुणदोषावर चालविण्यास संधी न दिल्याचे त्यांचे खुप

मोठे नुकसान होणार आहे. सबब, त्यांनी प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

४. दोन्ही बाजूंच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. पटलावर आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. अर्जदारतर्फे विधिज्ञांमार्फत युक्तीवद करण्यात आला की, प्रस्तुतचा प्रतिदावा प्रतिवादी क्र.३३ याने दिनांक ०५.०९-१९५६ रोजीचे बाक्षीसपत्र तसेच, दिनांक १०.०५.१९९० रोजीचे खरेदी खत रद्द होऊन मिळावे अशा जाहीर ठरावासाठी दाखल केलेला आहे. मात्र, या प्रतिदाव्यामधील कथनांचे वाचन केल्यास प्रतिवादी क्र.३३ च्या प्रतिदाव्यास मुदतीच्या कायद्याची बाधा येते. त्यामुळे प्रतिवादी क्र.३३ चा प्रतिदावा नामंजूर करण्यात यावा. आपल्या कथनांच्या पुष्ठ्यर्थ त्यांनी आपली भिस्त **राघवेंद्र शरणसिंग वि. रामप्रसन्न सिंग, निकाल तारीख १३.०३.२०१९ व रमीसेट्टी व्यंकटण्णा वि. नासयम जमाल साहेब, निकाल तारीख २८.०४.२०२३** रोजीच्या न्यायनिवाड्यावर ठेवली आहे.

६. प्रतिवादी क्र.३३ च्या विधिज्ञांमार्फत युक्तीवाद करण्यात आला की, सदरचा अर्ज हा मुळ दाव्यातील वादी क्र.२क याने दाखल केलेला असून सदरचा वादी हा त्याच्या प्रतिदाव्यात आवश्यक पक्षकार म्हणून सामील नाही. त्यामुळे, सदरचा अर्ज चालणेस पात्र नाही. तसेच, मुळ वादी क्र.२क ने वादी क्र.१ साठी कोणतेही अधिकारपत्र दाखल केलेले नाही. तसेच, प्रस्तुतचा अर्ज हा केवळ दाव्यामधील कथनांचा विचार केल्यावरच निकाली करण्यात येतो, किंबहूना हा अर्ज निकाली करण्यासाठी केवळ दावा बघणे आवश्यक आहे. जे बक्षीसपत्र व खरेदीखत रद्द करण्याची मागणी प्रतिवादी क्र.३३ ने केलेली आहे, त्याबाबत गुणदोषांवर पुर्ण पुराव्याअंती निर्णय देता येईल. या सर्व कारणांमुळे वादी क्र.२क चा

अर्ज नामंजूर करण्यात यावा. आपल्या कथनांच्या पुष्ठ्यर्थ त्यांनी खालील न्यायनिवाड्यांवर आपली भिस्त ठेवली आहे.

१. **एच.एस. दिक्षीत व इतर वि. मे. मेटरोपोली ओव्हरसिज लि. व इतर, २०२२ लाईव्ह लॉ (सुप्रिम कोर्ट) ७०३**

२. **कुमारी गिता व इतर वि. नंजुंदास स्वामी व इतर, २०२३ लाईव्ह लॉ (सुप्रिम कोर्ट) ९४०,**

३. **एलडेको हौसींग ॲन्ड इंडस्ट्रिज वि. अशोक विद्यार्थी व इतर, २०२३ लाईव्ह लॉ (सुप्रिम कोर्ट) १०३३**

**७.** दोन्ही विधिज्ञांच्या युक्तीवादाच्या अनुषंगाने पटलावर असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रतिवादी क्र.३३ चा प्रतिदावा हा दिनांक ०५.०९.१९५६ रोजीचे बक्षीसपत्र व दिनांक १०.०५.१९९० चे खरेदीखत रद्द होऊन मिळावे अशा जाहीर ठरावासाठी तसेच, निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. मुळ वादी क्र.२क चे अर्जानुसार प्रतिवादीची बक्षीसपत्र व खरेदीखत रद्द होऊन मिळण्याबाबतची मागणी मुदतबाह्य असल्यामुळे त्याचा प्रतिदावा फेटाळण्यास पात्र आहे. प्रतिवादी क्र.३३ चे म्हणण्यानुसार वर नमुद बक्षीसपत्र व खरेदीखताबाबत त्याला जानेवारी, २०२२ मध्ये कळाले. या दोन्ही दस्तांच्या शाबीतीसाठी दोन्ही बाजूंचा पुरावा पटलावर येणे आवश्यक आहे. केवळ या दोन्ही दस्तांच्या तारखांवरुन दाव्याच्या या स्थितीत प्रथमदर्शनी प्रतिवादी क्र.३३ चा प्रतिदावा मुदतबाह्य आहे असे म्हणणे न्यायोचित होणार नाही. सबब, या दोन्ही दस्तांच्या जाहीर ठरावासाठी पटलावर येणारा दोन्ही बाजूंचा पुरावा पाहणे न्यायाच्या दृष्टिने उचित होईल. सबब, प्रतिवादी क्र.३३चा प्रतिदावा हा मुदतबाह्य आहे असे विनापुरावा म्हणता येणार नाही.

८. वर नमुद युक्तीवादाच्या अनुषंगाने येथे एक गोष्ट नोंद करणे आवश्यक आहे की, प्रतिवादी क्र.३३ हा मुळ दाव्यामध्ये दिवाणी प्रक्रिया आदेश १ नियम १० चे अर्ज नि. १३४ वरील आदेशानुसार प्रतिवादी म्हणुन सामील झालेला आहे. त्यानंतर, त्याने दाव्यास कैफियत दिली असून या कैफियत सोबत त्याचा प्रतिदावा दाखल केला आहे. मात्र, या प्रतिदाव्यामध्ये मुळ दाव्यातील वादी क्र.१ व इतर प्रतिवादी यांना त्याने प्रतिदाव्यातील प्रतिवादी म्हणुन सामील केले आहे. परंतु, मुळ दाव्यातील वादी क्र.२ व त्याचे वारस यांना त्याने प्रतिदाव्यामध्ये सामील केलेले नाही. प्रतिदावा हा दाव्याप्रमाणेच चालत असून त्यामध्ये मुळ दाव्यातील वादी क्र.२ हा सामील नसल्यामुळे कायद्याच्या प्रस्थापित तत्वांनुसार त्याचा प्रतिदाव्याशी संबंध नसल्यामुळे त्याचा प्रस्तुत अर्ज कायद्याप्रमाणे चालण्यास पात्र नाही. सबब, खालील प्रमाणे ओदश पारित.

**<u>आदेश</u>**

**१.** प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला).

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PANKAJA PRASAD AJGAONKAR
Date: 2024.09.21 14:47:38 +0530

इस्लामपूर (पंकजा प्र. आजगांवकर)

दिनांक- २०.०९.२०२४. ४थे सह दि.न्या.क.स्तर, इस्लामपूर

| - : C E R T I F I C A T E : - | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this Pdf file order is same word as per original order. | | |
| Name of Stenographer | :- | Satish N. Pethkar, |
| Court Name | :- | Pankaja P. Ajgaonkar,<br>4th Jt. Civil Judge (J.D.) and<br>J.M.F.C., Islampur |
| Date of decision | :- | 20.09.2024 |
| Order signed by P.O. on | :- | 20.09.2024 |
| Order uploaded on | :- | 21.09.2024 |